


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचालन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३३२ वा    मंगळवार    दि ३१ मार्च    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# दोन्ही पदं गेली, आता रुपाली चाकणकर यांना आणखी एक धक्का; चौकशीसाठी बोलावलं जाण्याची शक्यता

**वृत्तसंस्था/ नाशिक**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या महिला अत्याचार प्रकरणाचा भांडाफोड झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदासह राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्षपदही गमवावं लागलं. अशोक खरातसोबत असलेल्या जवळीकीमुळे राजकीय नामुष्की ओढावलेली असतानाच आता रुपाली चाकणकर यांना आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे. कारण अशोक खरात प्रकरणात विशेष तपास पथक अर्थात एसआयटीकडून कसून चौकशी केली जात आहे. अशातच खरात आणि त्याच्या शिवनिका संस्थानशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाचा तपास आता अधिक व्यापक होत चालला असून या संस्थेच्या सर्व आजी-माजी सदस्यांची आता चौकशी होणार असल्याची माहिती पुढे येत आहे. विशेष म्हणजे या चौकशीच्या फेऱ्यात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचीही कडून चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शिवनिका संस्थांच्या माध्यमातून करण्यात आलेले सर्व आर्थिक व्यवहार आणि संशयास्पद गुंतवणुकीची कागदपत्रे देखील विशेष पोलीस तपास पथकाच्या रडारवर आहेत. या संस्थांमध्ये आजवर कोण कोण सदस्य होते, कोणाच्या काळात कोणते निर्णय घेण्यात आले? याची देखील सखोल माहिती तपास पथकाने गोळा करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे लवकरच सर्व आजी माजी सदस्यांना चौकशीसाठी बोलावले केले जाणार असल्याचे समजते आहे. त्यामुळे या संस्थानच्या मंडळात सदस्य राहिलेल्या रुपाली चाकणकर यांनाही चौकशीसाठी बोलावले जाईल, अशी माहिती आहे. मुख्य संशयित अशोक खरात याची आज पोलिस कोठडी संपल्यानंतर त्याला आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास नाशिक जिल्हा व सत्र न्यायालय येथे हजर करण्यात आलं. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने खरातला ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, अशोक खरात याच्या अटकेनंतर या प्रकरणाचे




धागेदोरे राजकीय वर्तुळापर्यंत पोहोचत असल्याने नाशिकसह संपूर्ण राज्यात या तपासाबाबत कमालीची उत्सुकता निर्माण झाली असून या प्रकरणाच्या तपासात आगामी काळात नेमके काय धागेदोरे उलगडतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणात होणार लवकरच मोठा भूकंप....


## शिवसेनेच्या खासदार ज्योती वाघमारे यांचा दावा...



**वृत्तसंस्था/ नांदेड**

अलीकडच्या काळात राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी पाहायला मिळाल्या. भाजपचं ऑपरेशन लोटस असो किंवा राष्ट्रवादी पक्षातील विभाजन, यावरून राज्याचं लक्ष वेधलं गेलं होतं. आता पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप होणार असल्याचे संकेत शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या तथा राज्यसभेच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी दिले आहेत. ऑपरेशन टायगर किंवा ऑपरेशन तुतारी होणार, जे पण होणार योग्य वेळी होणार असल्याचे खासदार ज्योती वाघमारे म्हणाल्या. नांदेडमध्ये संध्याताई प्रतिष्ठान तर्फे आयोजित महिलांच्या सत्कार कार्यक्रमासाठी ज्योती वाघमारे या आज नांदेडला आल्या होत्या. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना हे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्याने राजकारणात खळबळ उडाली आहे. मागील काही काळात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडून दोन वेगवेगळे पक्ष झाले आहेत. पक्ष फुटीनंतर शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील अनेक नेत्यांनी शिवसेना शिंदे गट आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. आणखी काही खासदार पक्ष सोडणार असल्याची चर्चा राजकारणात सुरु आहे. त्यातच शिवसेना शिंदे गटाच्या राज्यसभेच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी खळबळजनक दावा केला आहे. राजकारणात काहीतरी होणार आहे. मोठा भूकंप होणार आहे. राजकारणात परफेक्ट टाईमिंग खूप महत्त्व असतं. तेव्हा योग्य वेळ आल्यानंतर नक्की सांगू, असं म्हणत खासदार ज्योती वाघमारे यांनी राजकीय बॉम्ब टाकला. अशोक खरात प्रकरण देशभर गाजत आहे. या घटनेचा सर्वस्तरातून निषेध केला जात आहे. राज्यसभेच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी देखील निषेध करत राज्यात महिलांवर होत असलेल्या अत्याचाऱ्याच्या घटनांवर खंत व्यक्त केली आहे. अशोक खरात या भोंदूबाबाने ज्या प्रकारे महिलांवर अत्याचार केले आहेत ते चीड आणणारे आहे. महिलेचा सन्मान करायला पाहिजे, महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रलंबित असलेला शक्ती कायदा पारित करण्यासाठी आणि महिला सुरक्षित राहण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खासदार ज्योती वाघमारे म्हणाल्या. अत्याचाराच्या घटनेत नराधमाला शिक्षा व्हावी पाहिजे, मात्र चर्चेचे फोकस आपल्याकडे वळवण्यासाठी राजकारण करू नये, असा सल्ला त्यांनी विरोधकांना दिला. अजित पवार यांच्या विमान अपघाताला दोन महिने पूर्ण झाले आहेत. या प्रकरणी विरोधकांकडून आरोप केले जात आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्याकडून देखील घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यावर ज्योती वाघमारे यांनी प्रतिक्रिया दिली. सुप्रिया सुळे या अजित पवार यांच्या भगिनी आहेत, भावाप्रति माया कुठल्याच शब्दात वर्णन करता येत नाही. त्यांना काय वेदना होत आहेत हे मी समजू शकते. अजित पवार यांच्या संदर्भात कसं घडलं, काय घडलं, अपघात होता की घातपात, याबाबत संपूर्ण चौकशी केली जाईल, असं अभिवचन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे ज्योती वाघमारे यांनी सांगितलं. या प्रकरणात निष्पक्ष चौकशी होईल माझा विश्वास आहे, असं खासदार ज्योती वाघमारे म्हणाल्या.

# ज्येष्ठांभोवतीचा सायबर सापळा





ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाइन फसवणूक हे आजच्या घडीचे भीषण सामाजिक संकट झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलांमध्ये मागे राहिलेला हा वयोगट गुन्हेगारांसाठी सर्वांत मोठा ङ्गसॉफ्ट टार्गेटफ ठरत आहे. यामागील कारणांचा शोध घेतला, तर सर्वांत ठळक बाब दिसून येते ती, यांच्याकडे असलेला निवृत्तीनंतरचा पैसा आणि तंत्रज्ञानाबद्दले अज्ञान. ज्येष्ठ नागरिक आपल्याला स्मार्ट मोबाइल सहजतेने हाताळताना दिसत असले, तरी सोशल मीडिया कसा वापरायचा, एकूणच मोबाइल वापराचे डूज अँड डोन्ट्सफ याची त्यांना पुरेशी माहिती नाही. त्यांच्याकडे ङ्गमाध्यम साक्षरताफनाही, डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण नाही. तंत्रज्ञानामध्ये भराभर जे काही बदल होत आहेत, त्या बदलांना जुळवून घेण्याच्या नादात त्यांच्याकडून अनेक चुका होतात. त्यातल्या प्रकर्षाने दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे, सोशल मीडियावरील पोस्ट भराभर एकमेकांना फॉरवर्ड करणे आणि सोशल मीडियावरील गोष्टींवर चटकन विश्वास ठेवणे. जे कुठेतरी छापलेले आहे त्यावर विश्वास ठेवला पाहिजे, असा त्यांचा समज आहे. त्यामुळे आपल्याकडील कंन्टेंट तपासून पाहिले पाहिजे, विचारले पाहिजे किंवा या फसवणुकीच्या गोष्टी असू शकतात, याची जाणीव त्यांना नसते. आणि इथेच गुन्हेगारांचे फावते. ज्येष्ठ नागरिकांबाबत घडणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीत ङ्गडिजिटल ॲरेस्टफ हा सर्वांत भयावह प्रकार आहे. पोलिस, सीबीआय, कस्टम, रिझर्व्ह बँक आदी सरकारी संस्थांबद्दल आधीच सर्वसामान्यांच्या मनात एक भीती असते. हे सायबर गुन्हेगार नेमक्या याच नावांचा वापर करून ज्येष्ठांना भीती दाखवतात. त्यातच ईडीसारख्या संस्थेची तर दहशतच अलीकडच्या काळात निर्माण झाली आहे. ही संस्था काहीही करू शकते, कोणालाही अटक करू शकते, हे लोकांनी अनुभवले आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक या बनावाला बळी पडतो. डिजिटल ॲरेस्टफबरोबरच त्यांच्यासोबत वेगवेगळे गुंतवणूक घोटाळेदेखील होत आहेत. त्यामध्ये या ज्येष्ठ नागरिकांना गुंतवून त्यांच्याकडून पैसे ट्रान्सफर करून घेणे हा त्यातला एक महत्त्वाचा भाग आहे. निवृत्तीनंतर आलेल्या पैशांबाबतचा डेटा अनेक ठिकाणी लीक होतो, हे येथे लक्षात घ्यायला हवे. यात आणखी एक गोष्ट जाणवते ती म्हणजे, अलीकडच्या काळात जे मोठे घोटाळे झालेले आहेत; त्यांचा या फसवणुकीसाठी वापर केला जातो. उदा. जेट एअरवेज बंद झाली, त्यात काय घोटाळे झाले, त्यातील व्यक्तींच्या नावांचा वापर करून, ङ्गया घोटाळ्यामधले काही पैसे तुमच्या अकाउंटला आले आहेत. म्हणून तुमचे खाते आम्हाला गोठवावे लागत आहे.फ किंवा ङ्गसोशल मीडियावर तुम्ही मुलांबाबतचा लैंगिक कंन्टेंट पाहिला आहे आणि त्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. त्याबद्दल तुम्हाला अटक होऊ शकते,फ अशी भीती दाखवल्यामुळे लोक घाबरून जातात. अशा प्रकरणांत ज्येष्ठांना तशी भीतीच घातली जाते. ही गोष्ट तुम्ही कोणालाही, अगदी तुमच्या मुलांनाही कळवली, तरी तुमच्यासोबत तुमच्या मुलांनाही आम्ही अटक करू. ङ्गतुमच्या सर्व कुटुंबाला यातून धोका आहे,फ असे सांगून त्यांना सतत कॅमेऱ्यासमोर बसवून ठेवले जाते. एक अशीच केस आमच्याकडे आली होती. त्यात नवरा-बायको दोघेही ज्येष्ठ नागरिक होते. महत्त्वाचे म्हणजे ते व्यावसायिक होते. जवळपास साडेसहा कोटी रुपये त्यांनी समोरच्या व्यक्तीला दिले. आपली होती नव्हती ती मालमत्ता विकून त्यांनी पैसे दिले. स्कॅम्समधून तुमच्या बँक खात्यात काही पैसे आले आहेत, असे समोरच्या व्यक्तीने सांगितले होते. त्याने यासाठी सांगितलेल्या रकमादेखील खऱ्या होत्या. कारवाई टाळायची असेल, तर हे पैसे तुम्हाला आत्ताच्या आत्ता ट्रान्स्फर करावे लागतेल. ते पैसे ट्रान्सफर केल्यानंतर हे सगळे प्रकरण मिटवण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. नाही तर तुमच्या परदेशात असेल्या मुलाला आम्हाला यात गुंतवावे लागेल. त्याचा व्हिसा रद्द होईल. आम्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर ही माहिती जाहीर करू,फ अशा धमक्या त्यांना दिल्या. त्यामुळे त्यांनी ही गोष्ट कुणालाच सांगितली नाही. आणि शेवटी अशी परिस्थिती आली की द्यायला पैसेच उरले नाहीत. त्यानंतर त्यांनी ही गोष्ट मित्राला सांगितली. तेव्हा हे प्रकरण डिजिटल ॲरेस्टफचे असल्याचे समजले. त्यानंतर ते पोलिसांकडे गेले. तिथून ही केस आमच्याकडे आली. आम्ही त्यांना मदत केली, समुपदेशन केले. पोलिसांकडून काही रक्कम गोठवण्यात आली, पण ती फारच तोकडी आहे. ज्येष्ठ नागरिकांना भीती दाखवली जाते. अनेकांनी आम्हाला सांगितले की त्यांना हिप्नोटाइज झाल्यासारखे झाले. गुन्हेगार सतत मोबाइल किंवा लॅपटॉप सुरू ठेवायला सांगतात. त्यांच्यासमोर बसून ठेवले जाते. जेवायलासुद्धा त्यांच्यासमोर बसण्याचा आग्रह केला जातो. त्याबाबत कुणाला कळवले तर सगळी बँक खाती गोठवण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे लोक घाबरून जातात. लोकांमध्ये जागृती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न होत आहेत. सर्व माध्यमांत यासंदर्भातल्या बातम्याही येत असतात. मध्यंतरी सरकारने मोबाइल फोनच्या कॉलिंगमध्येसुद्धा याबाबतची ऑडिओ टेप लावलेली होती. तरीसुद्धा घटना थांबलेल्या नाहीत. आपण ङ्गडोअर टू डोअरफ कशा पद्धतीने जाऊ शकतो, सूक्ष्म पातळीवर कशा पद्धतीने योजना आखू शकतो, यावर सरकारने विचार करायला पाहिजे. कारण यातून लोकांचे जाणारे पैसे हे प्रचंड आहेत. आपण त्याकडे बघताना केवळ आर्थिक नुकसान बघतो, पण त्या लोकांचे आयुष्य पूर्ण उद्ध्वस्त होते. त्यांच्या मानसिक आरोग्यावरही प्रचंड परिणाम झालेला असल्यास या धक्क्यातून बाहेर येणे कठीण आहे. काही लोकांची आयुष्यभराची प्रॉपर्टी, पैसे गेलेले असतात. पुढे जगायचे कसे हा प्रश्न त्यांच्यापुढे असतो.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## अमित शाह यांचा लोकसभेत नक्षलवाद्यांना थेट इशारा; काँग्रेसच्या ६० वर्षांच्या कारभारावर डागली तोफ

# 'गोळीचं उत्तर गोळीनंच मिळणार!'

**मुंबई/वृत्तसंस्था :** "हे नरेंद्र मोदींचे सरकार आहे. जो कोणी शस्त्र उचलेल, त्याला परिणामांना सामोरे जावे लागेल. गोळीचे उत्तर गोळीनेच मिळणार", असे गृहमंत्री अमित शाह लोकसभेत नक्षलवादावर बोलताना म्हणाले. "चर्चा करण्यासाठी तयार असणाऱ्यांबरोबर चर्चा करायला हवी आणि जे गोळीची भाषा करतील त्यांना गोळीच मारायला हवी", असे परखड मत शाह यांनी मांडले. ७० वर्षांपैकी ६० वर्षे काँग्रेसने राज्य केले. मग विकास का झाला नाही? तुम्ही विकास का केला नाही? असा सवालही शाह यांनी यावेळी उपस्थित केला.

अमित शाह लोकसभेत नक्षलवादावर बोलत आहेत. या चर्चेबद्दल रेड कॉरिडॉरमधील १२ राज्ये आणि आदिवासी समुदायांच्या वतीने शाह यांनी आभार मानले. "बस्तरमधून नक्षलवाद आता जवळजवळ संपुष्टात आला आहे. बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा बांधण्याची मोहीम सुरू करण्यात आली. बस्तरमधील प्रत्येक गावात शिधावाटपाची दुकाने उघडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहेत", असे शाह म्हणाले. "नक्षलवादाचे मूळ कारण विकासाची मागणी नसून एक विचारसरणी असून, इंदिरा गांधींनी राष्ट्रपती निवडणुकीमुळे ती स्वीकारली होती", असे शब्दात त्यांनी काँग्रेसवर टीका केली. "भारतातील नक्षलवादाचा कालानुक्रमही शेअर करायचा आहे म्हणत अमित शाह यांनी ही चळवळ १९६९ मध्ये बंगालमधील नक्षलबाडी येथे सुरू झाल्याचे सांगितले. १९८० च्या दशकापर्यंत ती तीन राज्यांमध्ये पसरली. १९९० च्या दशकापर्यंत येथेही विलीनीकरण सुरू झाले. २००४ मध्ये, दोन गट विलीन होऊन सीपीआय (माओवादी) ची स्थापना झाली. २००० ते २००४ ही चार वर्षे वगळता, काँग्रेस पक्ष सत्तेत होता, असे अमित शाह म्हणाले. १९७० मध्ये 'सदसद्विवेकबुद्धीनुसार मतदान करा' अशी घोषणा तयार करण्यात आली." इंदिरा गांधींनी संजीव रेड्डी यांच्या विरोधात उमेदवार उभा केला. आपल्या पक्षात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी, इंदिरा गांधींनी माओवाद्यांचा पाठिंबा मिळवला. सत्तेवर येईपर्यंत त्या माओवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली होत्या. हा तो काळ होता जेव्हा माओवादाचा प्रसार झाला, असेही शाह सभागृहात बोलताना म्हणाले.



### काय म्हणाले अमित शाह?

अमित शाह यांनी यावेळी ऑपरेशन बुद्धा, ऑपरेशन थंडरस्टॉर्म आणि ऑपरेशन भीमबांधा यांचा उल्लेख केला. सर्व भाग नक्षलवाद्यांपासून मुक्त करण्यात आल्याचे देखील शाह म्हणाले. २१ दिवस चाललेल्या ब्लॅक फॉरेस्ट मोहिमेत सर्व शस्त्रे जप्त केली. यामुळे छत्तीसगड, तेलंगणा आणि ओडिशामधील नक्षलवादी चळवळ संपुष्टात आली. मी अत्यंत विनम्रतेने कोब्रा, छत्तीसगड पोलीस आणि सीआरपीएफला सलाम करतो, असे शाह लोकसभे बोलताना म्हणाले. शाह यांनी बसवराजू ते हिडमा यांच्यापर्यंतच्या ठार झालेल्या दहशतवाद्यांची नावे सभागृहात वाचून दाखवली. तसेच, वेणुगोपाल, वासुदेव, पल्लुरी प्रसादराव चंदना आणि टिपरी तिरुपती यांनी आत्मसमर्पण केल्याचे सांगितले.

## 'डावी आघाडी, म्हणजे भाजपचा समझोता'



**पथनमथिट्टा :** केरळमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी डावी आघाडी (एलडीएफ) आणि भाजपदरम्यान समझोता झाल्याची टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी केली. ते अडूर येथे काँग्रेसच्या सभेत बोलत होते. राहुल म्हणाले, "एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ म्हणाला होता की, बाजारात एक अदृश्य हात असतो, मात्र केरळच्या निवडणुकीत सध्या भाजपचा अदृश्य हात काम करत आहे. ते म्हणाले, जे भाजपविरुद्ध लढतात त्यांच्यावर कारवाई होते." माझ्यावर ३६ खटले आहेत, मला ५५ तास सतत चौकशीला सामोरे जावे लागल्याचे ते म्हणाले. 'एलडीएफ' नेतृत्वावर भ्रष्टाचाराचे आरोप करत गांधी म्हणाले की, "त्यांच्यावर कोणताही दबाव नाही. सर्वांना माहिती आहे की 'एलडीएफ'चे नेते भ्रष्ट आहेत, पण भाजप त्यांच्यावर कारवाई करत नाही." शबरीमला मुद्द्यावर ते म्हणाले, 'पंतप्रधान जिथे जातात तिथे मंदिर आणि धर्माबद्दल बोलतात, पण पलक्कड येथे त्यांनी शबरीमला विषयाचा उल्लेखसुद्धा केला नाही.' अय्यप्पा मंदिरातील कथित गैरव्यवहाराबाबतही मोदी यांनी मौन बाळगल्याचा आरोप त्यांनी केला.

## इराणने पाकिस्तानचा प्रस्ताव फेटाळला



**पलक्कड /वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात मध्यस्थी करण्यासाठी आपण तयार असल्याचा दावा पाकिस्तानने केला होता. मात्र या ऑफरनंतर इराणने पाकिस्तानच्या नेतृत्वाखाली अशा कोणत्याही मध्यस्थीच्या प्रयत्नांमध्ये आपला सहभाग स्पष्टपणे नाकारला आहे.

मुंबईतील इराणचे कॉन्सुलेट जनरल यांनी सोमवारी स्पष्ट केले की, अमेरिकेबरोबर कोणतीही थेट चर्चा झालेली नाही. तर फक्त मध्यस्थांमार्फत अवाढव्य आणि गैरवाजवी मागण्या समोर ठेवण्यात आल्या आहेत. दूतावासाने पाकिस्तानचे फोरम्स ही त्यांचे स्वतःचे आहेत आहेत आणि इराणने त्यात कोणताही सहभाग घेतलेला नाही, असेही स्पष्ट केले आहे. "अमेरिकेबरोबर कोणतीही थेट चर्चा झालेली नाही; फक्त मध्यस्थांमार्फत अवाढव्य, गैरवाजवी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. अमेरिकेची डिप्लोमसी सातत्याने बदलते; आमची भूमिका मात्र स्पष्ट आहे. पाकिस्तानचे फोरम्स हे त्यांचे स्वतःचे आहेत; आमचा त्यात सहभाग नाही. युद्ध संपवण्यासाठी प्रादेशातून होणाऱ्या आवाहनाचे स्वागत आहे, पण हे युद्ध कोणी सुरू केले हे लक्षात ठेवा!" असे इराणच्या कॉन्सुलेट जनरलनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

## रुपया आपटीनंतरही अर्थमंत्र्यांचा निर्धास्त रोख



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया अगदी सुस्थितीत असून, इतर विकसनशील अर्थव्यवस्थांच्या तुलनेत देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती देखील भक्कम आहे, असा निर्वाळा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी दिला.

पश्चिम आशियातील युद्धामुळे रुपयाचे सातत्याने अवमूल्यन सुरू आहे. हा संघर्ष २८ फेब्रुवारीला सुरू झाला तेव्हापासून रुपयाच्या मूल्यात ४.१ टक्क्यांची घसरण झाली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया शुक्रवारी (२७ मार्चला) ९४.८२ च्या पातळीवर बंद झाला होता. चालू आर्थिक वर्षात त्यात डॉलरच्या तुलनेत ९.९ टक्क्यांची घसरण झाली असून, रुपयासाठी गेल्या १४ वर्षांतील सर्वात आव्हानात्मक वर्ष ठरले आहे.

या पार्श्वभूमीवर विचारण्यात आलेल्या पुरवणी प्रश्नावर लोकसभेत लेखी उत्तरात सीतारामन यांनी वरील निर्वाळा दिला. त्या म्हणाल्या की, भारतीय अर्थव्यवस्था भक्कम स्थितीत असून, संपूर्ण जगाकडून आपल्या वित्तीय शिस्तीचे कौतुक होत आहे. आपली परकीय चलन गंगाजळीही चांगली आहे. इतर विकसनशील अर्थव्यवस्थांच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ठीक पातळीवरच आहे. केवळ रुपयाचेच अवमूल्यन झालेले नाही. पश्चिम आशियातील संघर्ष सुरू झाल्यापासून प्रमुख आशियाई चलनांचे अवमूल्यन झाले आहे. दक्षिण कोरियातील वॉन, थायलंडचे बात आणि फिलिपिन्सचे पेसो या चलनांचे रुपयापेक्षा किती तरी जास्त अवमूल्यन झाले आहे. डॉलरच्या तुलनेत वॉनचे अवमूल्यन ४.६ टक्के, बातचे अवमूल्यन ५.५ टक्के आणि पेसोचे अवमूल्यन ४.८ टक्के आहे, असेही सीतारामन यांनी लेखी उत्तरात स्पष्ट केले. मागे ऑक्टोबर २०२२ मध्ये मूल्य वेगाने ढासळत असलेल्या रुपयाबद्दल अर्थमंत्र्यांना प्रश्न केला गेला असता, 'रुपया गडगडत नाही, तर डॉलर मजबूत होत आहे' असे त्यांनी उत्तर दिले होते. त्याच उत्तराची त्यांनी सद्यःस्थितीती पुनरावृत्ती केली. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले की, रुपयाचे मूल्य बाजारपेठेतील मागणी-पुरवठ्याचे समीकरण ठरविते आणि त्यावर परिणाम करणारे अनेक घटक असतात. सरकार आणि रिझर्व्ह बँक रुपयाच्या मूल्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. देशातील महागाईत घट झाली असून, किरकोळ महागाईचा दर २०२०-२१ मध्ये ६.२ टक्के होता आणि २०२४-२५ मध्ये तो ४.६ टक्क्यांवर आला. हा दर चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते फेब्रुवारी या कालावधीत १.९ टक्के आहे. बहुतांश अत्यावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर आहेत अथवा त्यात घसरण होत आहे.

# अमेरिका–इराण तणाव वाढला; युद्धाचा संभ्रम कायम

**दुबई/वृत्तसंस्था :** इराणबरोबर चांगली चर्चा सुरू आहे', 'इराणमध्ये अमेरिकेने यापूर्वीच सत्ताबदल केला असून, नवे नेते योग्य वाटतात', अशी विधाने एकीकडे करताना 'अमेरिका इराणमधील खार्ग बेटांचा ताबा घेऊ शकते', असे विधानही अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले. दुसरीकडे इराणने अमेरिकेच्या मागण्या अवास्तव असल्याचे सांगून, अमेरिकेबरोबर थेट संवाद अद्याप झाला नसल्याचे म्हटले आहे.

अमेरिका-इराणमधील या परस्परविरोधी टिप्पणीमुळे युद्ध संपण्याबाबतचा संभ्रम कायम असून, त्याची परिणती सोमवारी तेलाच्या किमतीमध्ये वाढ होण्यात झाली. कच्चे तेल प्रतिपिंप ११६ डॉलरवर गेले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, 'इराणमधील अत्यंत महत्त्वाचे तेलकेंद्र असलेल्या खार्ग बेटावर अमेरिका ताबा घेऊ शकते. आम्ही खार्ग बेट घेऊ किंवा घेणारही नाही. आमच्याकडे अनेक पर्याय आहेत. आम्ही कदाचित तिथे (खार्ग बेटावर) काही काळही घालवू.' अमेरिकेचे आक्रमण झाल्यास इराणने पर्शियन आखातात सुरुंग पेरण्याची धमकी दिली आहे. अन्य एके ठिकाणी ट्रम्प म्हणाले, 'आयातुल्ला अली खामेनी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना हवाई हल्ल्यामध्ये मारून अमेरिकेने इराणमध्ये सत्ताबदल यापूर्वीच घडविला आहे. त्यांच्या जागी आलेले नेते आता योग्य वाटतात.' खामेनी यांच्यानंतर त्यांच्या जागी त्यांचा मुलगा मोजताबा खामेनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सोमवारपासून पुढे काही दिवस २० तेलवाहू नौका सोडण्याची तयारी इराणने दाखविल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. अमेरिकेच्या १५ मुद्द्यांच्या प्रस्तावात अवास्तव मागण्या केल्याचे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते ईस्माईल बघाई यांनी सांगितले आहे. ते म्हणाले, 'अमेरिकेबरोबर अद्याप थेट चर्चा झाली नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. आमच्यापर्यंत जो संवाद पोहोचविण्यात आला, ते १५ मुद्दे हे अवास्तव, अतिरेकी आणि विचारशून्य आहेत.' युक्रेनचे अध्यक्ष व्लोदोदिमिर झेलेन्स्की यांनी सौदी अरेबिया, संयुक्त अरब आमिराती, कतार, जॉर्डन यांच्याबरोबर संरक्षण आणि आर्थिक सहकार्यवृद्धीचे करार केले. लष्करी तंत्रज्ञान, ऊर्जा, व्यापार क्षेत्रात किमान दशकभरासाठी सामरिक सहकार्य करण्यात येईल, असे झेलेन्स्की म्हणाले. काळ्या समुद्रातील वाहतूक नौदलासाठी तयार केलेले ड्रोन वापरून सुरळीत केल्याचा अनुभव सांगून होर्मुझच्या सामुद्रधुनीसाठीही त्याचा उपयोग होईल, असे ते म्हणाले.



आखातातील युद्ध तुमच्याशिवाय कुणीही थांबवू शकत नाही, असे मी अध्यक्ष ट्रम्प यांना सांगितले आहे. मी मानवतेच्या, शांततेच्या दृष्टिकोनातून हे बोलत आहे. या प्रदेशातील जनतेच्या वतीने मी युद्ध थांबविण्याचे थेट साकडे तुम्हाला घालत आहे, असे इजिप्तचे अध्यक्ष आब्देल फताह म्हणाले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मी तुमच्या लायकीचा बाप नाही'; व्हॉट्सॲपवर मेसेज केला अन् वडिलांनी उचललं टोकाचं पाऊल

**सोलापूर :** जुगारात सर्व काही हरलेल्या हताश बापाने मोठ्या मुलाला शेवटचा व्हाटसअप मेसेज करून आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या मुलाला व्हॉट्सॲपवर एक शेवटचा मेसेज पाठवला होता. या मेसेजमध्ये त्यांनी आपल्या वाईट सवयी आणि जुगाराच्या व्यसनाचे कारण सांगितले आहे. अनिल मारुती नरवडे(वय 57 वर्ष,रा मुरारजी पेठ, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. मला माफ कर, मी तुमच्या लायकीचा वडील ठरू शकलो नाही, एका हताश बापाने मुलाला केलेले व्हाट्सअप चॅटिंग सोलापुरात वायरल झाले आहे. हा वायरल मेसेज पाहून सोलापूर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अनिल नरवडे यांनी 28 मार्च रोजी शनिवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सोलापूर विजयपूर महामार्गावर असलेल्या छत्रपती संभाजी तलावात



(कंबर तलाव) उडी जीवनयात्रा संपवली आहे.शासकीय रुग्णालयात नातेवाईकांनी माहिती देताना सांगितले, अनिल नरवडे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या मुलाला व्हॉट्सॲपवर एक शेवटचा मेसेज पाठवला होता. या मेसेजमध्ये त्यांनी आपल्या वाईट सवयी आणि जुगाराच्या व्यसनाचे कारण सांगितले आहे."अनु, मी जे काही बोलत आहे ते माझ्या मजबुरीमुळे बोलत आहे, त्यामुळे तू रागावू नकोस. मी मुळात वाईट असल्यामुळेच हे सर्व घडत आहे. मी जुगारी असल्यामुळे आजवर हे सर्व घडत गेले आहे. आपली गाडी मी कुठे गहाण ठेवली आहे, हे तुला सांगून लक्षात येणार नाही. त्यामुळे राहुल कोळी याला सोबत घेऊन जा. मी कुठे जुगार खेळत होतो, हे त्याला माहित आहे. तिथे मी ३०,००० रुपयांत गाडी गहाण ठेवली आहे, ती सोडवणे आता तुझे काम आहे.कृष्णा, मी माझ्या सर्व जबाबदाऱ्यांचे ओझे तुझ्यावर सोडून जात आहे, कारण मी तुमच्या लायकीचा वडील राहिलो नाही. मी वाईट मार्गाला लागलो असल्यामुळे कधीच सुधारू शकलो नाही. तुम्ही मात्र माझा मार्ग कधीच धरू नका, कारण माझा मार्ग कधीच चांगला ठरला नाही. म्हणूनच मी आता हा शेवटचा मार्ग निवडत आहे. तू फक्त भैय्या, आई आणि तुझ्या मम्मीचा सांभाळ कर. माझी अपेक्षा फक्त तुझ्याकडूनच आहे आणि मला खात्री आहे की तू माझ्या शब्दांचे पालन करशील.

मला माफ कर, मी तुमच्या लायकीचा वडील ठरू शकलो नाही. ही माझी शेवटची इच्छा समजून तू आई, भैय्या आणि तुझ्या मम्मीचा सांभाळ कर. मी शेवटच्या क्षणी तुझ्याकडे काहीतरी मागत आहे, मला खात्री आहे की तू माझी ही इच्छा पूर्ण करशील. मी तुमच्या विश्वासावर तुम्हाला सोडून निरोप घेत आहे, कारण मी स्वतःला तुमचा वडील किंवा पप्पा म्हणवून घेण्याच्या लायकीचा उरलो नाही."

## बांगलादेशी चोरट्याच्या पुणे पोलिसांनी वाराणसीत पोहोचून मुसक्या आवळल्या

**पुणे :** रॉयल एनफिल्ड 'हिमालयन'वरून देशभर फिरून घरफोड्या करणाऱ्या एका सराईत बांगलादेशी चोरट्याला पुणे पोलिसांनी वाराणसीतून बेड्या ठोकल्या आहेत. पुण्यातील कर्वेनगरमधील एका स्टुडिओत चोरी केल्यानंतर हा आरोपी तांत्रिक तपासाच्या जाळ्यात अडकला. धक्कादायक म्हणजे, हा चोरटा भारतात बनावट नावाने वावरत असून त्याच्यावर विविध राज्यांत ३६ गुन्हे दाखल आहेत. अलंकार पोलिसांनी मोठ्या शिताफीने पाठलाग करून या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश केला असून त्याच्याकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.कर्वेनगरमधील एका स्टुडिओत झालेल्या घरफोडीचा तपास करताना पोलिसांना धक्कादायक माहिती समोर आली. रॉयल एनफिल्ड हिमालयन बाईकवरून देशभर फिरत घरफोड्या करणारा बांगलादेशी सराईत गुन्हेगारच या चोरीमागे असल्याचे उघड झाले. अखेर अलंकार पोलिसांनी थेट वाराणसी गाठत त्याच्या मुसक्या आवळल्या.१४ मार्चच्या मध्यरात्री कर्वेनगर परिसरातील फोटोग्राफी स्टुडिओची खिडकी फोडून आरोपीने आत प्रवेश केला होता. त्यानंतर कॅमेरे, लेन्स, ड्रोन आणि आयफोन असा सुमारे ६ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. या घटनेनंतर पोलिसांनी सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान आरोपीचा प्रवास उघड झाला. पुण्यातून तो हैदराबाद, चंद्रपूर, नागपूर, जबलपूर आणि मिर्झापूर असा मार्ग कापत उत्तर प्रदेशात पोहोचला होता. यानंतर अलंकार पोलिसांनी वाराणसी पोलिसांच्या मदतीने सापळा रचला आणि त्याला ताब्यात घेतले.महंमद बशर नूर महंमद (वय ३८, रा. ढाका, बांगलादेश) असे अटक आरोपीचे नाव आहे. तो 'नेवानाथ विनोदकुमार' या बनावट नावाने भारतात वावरत असल्याचे समोर आले. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल, विविध देशांचे चलन आणि बांगलादेशी पासपोर्ट जप्त करण्यात आला आहे.आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध आंध्र प्रदेश आणि तेलंगणात एकूण ३६ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी २९ गुन्ह्यांमध्ये तो यापूर्वी अटकेत होता, तर काही प्रकरणांमध्ये तो फरार होता. दरम्यान, या चोरट्याने देशातील इतर शहरांमध्येही अशाच प्रकारच्या घरफोड्या केल्या असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, त्यादृष्टीने पुढील तपास सुरू आहे.

## उमरझरीत महिलेवर वाघाचा हल्ला

**भंडारा :** साकोली तालुक्यातील बाम्पेवाडा येथे वाघाच्या हल्ल्यात मोहफूल संकलन करणाऱ्या शेतमजुराचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, शेजारील उमरझरी शेतशिवारात वाघाने एका शेतमजूर महिलेवर प्राणघातक हल्ला केल्याने खळबळ उडाली आहे.शनिवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेत माया रामकृष्ण सोनावणे या गंभीर जखमी झाल्या. वनविभागाच्या उदासीनतेमुळे संतप्त झालेल्या काही स्थानिक नागरिकांनी जंगल परिसरात जाळपोळ केली.शनिवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास माया सोनावणे आणि त्यांचे पती रामकृष्ण सोनावणे हे आपल्या शेतात हिरव्या मिरच्या तोडण्याचे काम करत होते. यावेळी शेतालगतच्या जंगलातून अचानक आलेल्या पट्टेदार वाघाने माया यांच्यावर हल्ला केला. वाघाने आपल्या तीक्ष्ण दातांनी माया यांची मान पकडून त्यांना सुमारे १० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले. हा थरार पाहून पती रामकृष्ण यांनी आरडाओरडा केली. जवळच काम करणाऱ्या इतर शेतकरी आणि मजुरांनी तातडीने धाव घेतल्याने वाघाने माया यांना सोडून जंगलात पळ काढला. यात महिलेच्या गळ्याला गंभीर खोल जखम झाली आहे.

## सांगलीच्या कारागृहात गँगवार

**सांगली :** कारागृहातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कारागृहाच्या आवारातच दोन सराईत गुन्हेगारांच्या टोळ्यांमध्ये भीषण राडा झाला असून, १६ जणांच्या टोळीने दोन गुंडांना विटांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या वर्चस्ववादातून झालेल्या हाणामारीमुळे कारागृह प्रशासनाची मोठी धावपळ उडाली असून परिसरात खळबळ माजली आहे.सांगली कारागृहातील खुल्या मैदानात कैद्यांना सोडण्यात आले असताना हा प्रकार घडला. जखमी झालेला पवन साळुंखे हा एक सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी 'एमपीडीए' (MPDA) अंतर्गत कारवाई करून त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. त्याचा साथीदार मेघशाम ऊर्फ मोठ्या जाधव हा देखील गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्याने या दोघांना सुरक्षेच्या कारणास्तव वेगळ्या बॅरॅकमध्ये ठेवण्यात आले होतेदुसरीकडे, त्यांचे कट्टर विरोधक मानले जाणारे आदित्य पवार आणि त्याचे १६ साथीदार वेगवेगळ्या गुन्ह्यांखाली याच कारागृहात दुसऱ्या बॅरॅकमध्ये बंदिस्त आहेत. शनिवारी जेव्हा या दोन्ही टोळ्यांतील सदस्य कारागृहाच्या खुल्या मैदानात समोरासमोर आले, तेव्हा त्यांच्यात शाब्दिक चकमक सुरू झालीमिळालेल्या माहितीनुसार, आदित्य पवारच्या टोळीने पवन साळुंखे आणि मेघशामला उद्देशून डिवचण्यास सुरुवात केली. "तुम्हाला वेगळ्या बॅरॅकमध्ये ठेवले आहे, म्हणून तुम्ही स्वतःला जास्त शहाणे समजता का?" असा सवाल करत १६ जणांच्या टोळीने त्यांना घेरले. यातून वादावादी वाढली आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. आदित्य पवारने आपल्या साथीदारांना ललकारत "यांना मारून टाका" असे आदेश दिले.जिवाच्या भीतीने पवन आणि मेघशाम यांनी मैदानातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, संख्येने जास्त असलेल्या १६ जणांच्या टोळीने त्यांचा पाठलाग केला. कारागृहाच्या आवारात पडलेल्या विटा उचलून या टोळीने दोघांवरही बेदम हल्ला चढवला. या हल्ल्यात पवन साळुंखे आणि मेघशाम ऊर्फ मोठ्या जाधव हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. अचानक झालेल्या या राड्यामुळे कारागृहात एकच गोंधळ उडाला. सुरक्षा रक्षकांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेनंतर सांगली शहर पोलिसांनी तातडीने दखल घेतली असून, हल्लेखोर १६ जणांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कारागृहासारख्या सुरक्षित ठिकाणी अशा प्रकारे टोळीयुद्ध भडकल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# पोलिसांनी स्पा सेंटरमध्ये 'ग्राहक' पाठवला, कन्फर्म होताच आरोपींच्या नांग्या ठेचल्या

**पुणे :** पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. वरून अगदी साधंसुधं दिसणारं स्पा सेंटर, पण आत मात्र पूर्ण वेगळाच धंदा सुरू असल्याचं पोलिसांच्या कारवाईत उघड झालं. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ढोले पाटील रोडवरील 'क्लिओ स्पा' या नावाने चालणाऱ्या या ठिकाणाबद्दल काही दिवसांपासून संशय व्यक्त केला जात होता. स्थानिकांमध्ये "इथे काहीतरी बिनसलंय" अशी चर्चा सुरू होती. अखेर ही माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली आणि त्यांनी खात्री करण्यासाठी सापळा रचण्याचा निर्णय घेतला.यासाठी पोलिसांनी बनावट ग्राहक तयार करून त्याला स्पामध्ये




पाठवलं. आत गेल्यानंतर त्याने पाहिलेलं चित्र वेगळंच होतं. स्पा सेवांच्या आड अनैतिक प्रकार सुरू असल्याचं स्पष्ट झालं. त्यानंतर ठरल्याप्रमाणे सिग्नल मिळताच पोलिसांनी तात्काळ धाड टाकली.अचानक पोलीस आत शिरताच तिथे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या कारवाईत दोन महिलांना तिथून बाहेर काढून त्यांची सुटका करण्यात आली. त्याचबरोबर प्रीती उर्फ त्रिप्तिका नायर (वय २१) हिला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या संपूर्ण कारवाईचं नेतृत्व पोलीस निरीक्षक ढगन कापसे यांनी केलं. व्यवस्थित नियोजन करून ही कारवाई करण्यात आली होती, त्यामुळे संशयितांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. "आपल्या भागात अशा प्रकारचे व्यवहार सुरू होते आणि आपल्याला काहीच कल्पना नव्हती," अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. त्यामुळे अशा ठिकाणांवर अधिक कडक कारवाई व्हावी, अशी मागणीही जोर धरते आहे. ही घटना समोर आल्यानंतर एक प्रश्न मात्र कायम आहे. हा प्रकार फक्त एका स्पापुरता मर्यादित आहे का, की यामागे मोठं जाळं कार्यरत आहे? पोलीस तपासातून याचा उलगडा होण्याची शक्यता आहे. एकूणच, स्पाच्या नावाखाली सुरू असलेल्या अशा गैरप्रकारांवर पोलिसांनी दिलेला हा धक्का इतरांसाठी स्पष्ट इशारा मानला जातोय.

# कोहली-पडिक्कलचा धडाका; आरसीबीने 204 धावांचा पाठलाग करत हैदराबादवर दणदणीत विजय

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ मध्ये पहिल्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने सनरायझर्स हैदराबाद संघावर सहा विकेटनी मात केली. जेकब डफीचा अचूक मारा आणि त्यानंतर विराट कोहली, देवदत्त पडिक्कलच्या आक्रमक अर्धशतकांच्या जोरावर 'हैदराबाद' ने दिलेले २०४ धावांचे लक्ष्य 'बेंगळुरू 'ने चार विकेटच्या मोबदल्यात १५.४ षटकांतच पूर्ण केले. पहिल्याच लढतीत चारशेहून अधिक धावा झाल्याने या मोसमातही धावांचा पाऊस पडणार, असा अंदाज वर्तविला गेला. सामना संपल्यावर बेंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदार याने सामन्याचा टर्निंग पॉइंट सांगितला.ज्या प्रकारे सर्व खेळाडूंनी मिळून योगदान दिलं हा एक चांगला संकेत आहे. यंदाच्या मोसमातील हा पहिला सामना होता. ज्यामध्ये आम्ही सर्वांनी मिळून संघासाठी चांगलं प्रदर्शन केलं. जेकब डफी दमदार




कामगिरी केली, पहिलं सामन्यात त्याने अभिषेक शर्मा आणि हेड यांची विकेट घेतली हात सामन्याचा टर्निंग पॉईंट होता. विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांनी भक्कम पाया रचला. कोहलीसाठी माझ्याजवळ कोणत्याही शब्द नाहीत, विशेष करून जेव्हा तो लक्ष्याचा पाठलागत असतो. कायम नंबर वन फलंदाज सारखा प्रदर्शन करतो, ज्याप्रकारे तो खेळत होता आणि संपूर्ण सामन्यात शेवटपर्यंत टिकून राहिला शानदार असल्याचं रजत पाटीदारने म्हटलं आहे. ईशान किशनने आयपीएल टी-२० क्रिकेट लीगमधील नेतृत्व पदार्पण धडाक्यात साजरे करताना ८० धावांची स्फोटक खेळी केली. त्यामुळे सनरायजर्स हैदराबादने लीगच्या नव्या मोसमातील शनिवारी झालेल्या पहिल्या सामन्यात द्विशतक पार केले. पॉवरप्ले पूर्ण होण्यापूर्वी तीन फलंदाज २९ धावांत परतल्यावरही 'हैदराबाद' ने ही कामगिरी केली हे विशेष. चिन्नास्वामी स्टेडियमवर दीर्घ कालावधीनंतर होणाऱ्या सामन्यास चाहत्यांची गर्दी अपेक्षितच होती. त्यांना 'हैदराबाद'च्या फलंदाजांनी १२ षटकार आणि १५ चौकारांची मेजवानी दिली. पॉवरप्लेच्या पहिल्या सहा षटकांत ४९ आणि अखेरच्या पाच षटकांत ४६ या कामगिरीची भरपाई 'हैदराबाद'ने मधल्या नऊ षटकांत १०६ धावांचा चोप देत केली. त्यात ईशानने क्लासेनसह दिलेला ५३ चेंडूतील ९७ धावांचा चोप महत्त्वाचा होता. त्याचबरोबर अनिकेत वर्माने १८ चेंडूत केलेल्या ४३ धावाही. ईशान त्याच्यापेक्षा प्रभावी होता. त्याने खेळलेल्या ३८पैकी १३ चेंडू सीमापार धाडले होते.दरम्यान, आरसीबीकडून विराटी कोहलीने ३८ चेंडूंत ५ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ६९ धावा, पडिक्कल २६ चेंडूंत ७ चौकार आणि ४ षटकारांसह ६१ धावा केल्या. दोघांच्या फलंदाजीने संपूर्ण सामना आरसीबीच्या पारड्यात झुकवला.

## वैभव सूर्यवंशीचं वादळ! रियान परागच्या राजस्थान रॉयल्सचा चेन्नईवर विजय


**गुवाहाटी/वृत्तसंस्था :** रियान परागच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या राजस्थान रॉयल्स संघाने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार सुरुवात केली आहे. स्पर्धेतील तिसरा आणि राजस्थान रॉयल्सचा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज संघाविरुद्ध पार पडला. गुवाहाटीतील बारसापरा स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघातील गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी केली. चेन्नईचा डाव १९.४ षटकात अवघ्या १२७ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सकडून सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशीने वेगवान अर्धशतकी खेळी केली. राजस्थान रॉयल्सने हा सामना ८ गडी राखून आपल्या नावावर केला.




राजस्थान रॉयल्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी १२८ धावांची गरज होती. संघात एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज असलेल्या राजस्थान रॉयल्स संघासाठी हे आव्हान फार मोठं नव्हतं. सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वालने मिळून पहिल्या विकेटसाठी ७५ धावा जोडल्या. यादरम्यान वैभव सूर्यवंशीने अवघ्या १५ चेंडूत दमदार अर्धशतक झळकावलं. तो १७ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांच्या साहाय्याने ५२ धावांची खेळी करून माघारी परतला. तर ध्रुव जुरेलने १८ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने नाबाद ३८ तर रियान परागने नाबाद १४ धावांची खेळी करून राजस्थानला विजय मिळवून दिला. या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. संजू सॅमसन आणि ऋतुराज गायकवाडने डावाची सुरुवात केली.

राजस्थान रॉयल्सकडून नांद्रे बर्गरने आधी संजू सॅमसनला ६ धावांवर बाद केलं. तर ऋतुराज गायकवाड देखील अवघ्या ६ धावा करून माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेला आयुष म्हात्रे गोल्डन डकवर माघारी परतला. तर मॅट शॉट अवघ्या २ धावा करून माघारी परतला.

## विराटने सोडला कॅच; अनुष्काला हसू आवरेना



**बंगळूर :** आयपीएल 2026 चा पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबादमध्ये सुरु आहे. चिन्नास्वामीच्या स्टेडियमवर पहिल्या सामन्याचा थरार सुरु आहे. आरसीबीने नाणेफेक जिंकली आणि कर्णधार रजत पाटीदारने प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथण फलंदाजी कराताना हैदराबादला चांगली सुरुवात करता आली नाही. या सामन्यात विराट कोहलीकडून एक मोठी चूक घडली.विराट कोहली ने झेल सोडला. अनिकेत वर्माला जीवदान मिळाले. कोहली लॉंग-ऑनवरून धावत आला आणि चेंडूपर्यंत पोहोचला, पण शेवटच्या क्षणी त्याच्याकडून चूक झाली. अनिकेतने न बघता शॉट मारण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा चेंडूशी संपर्क नीट झाला नाही. दुसरीकडे, अनुष्का शर्माला तिचे हसू आवरता आले नाही. कोहलीने झेल सोडल्यानंतर ती हसताना दिसली.विराट कोहलीने पुन्हा ती चूक केली नाही. अनिकेत वर्मालाच बाद केले. बाद होण्यापूर्वी अनिकेतने या षटकात दोन षटकार आणि एक चौकार मारला. अनिकेत वर्मा 43 धावा करुन बाद झाला. त्याला अर्धशतक पूर्ण करता आले नाही.

## एम. एस. धोनी आयपीएलमधून दोन आठवड्यांसाठी झाला बाहेर

**मुंबई/वृत्तसंस्था :** आताच्या घडीची मोठी बातमी समोर आली आहे. आयपीएलला आज सुरूवात होणार आहे, मात्र त्याआधी चेन्नई सुपर किंग्जच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. एम. एस. धोनी दुखापतीमुळे पहिल्या दोन आठवड्यांमध्ये आयपीएलला मुकणार आहे. सीएसकेसाठी वाईट बातमी असून त्यांचा पहिला सामना ३० मार्चला राजस्थान रॉयल्ससोबत होणार आहे. त्यामुळे चाहते निराश झाले असून माहीला पाहण्यासाठी आता त्यांना वाट पाहावी लागणार आहे. सीएसकेने याबाबत आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर माहिती दिली आहे.




एम. एस. धोनी पोटरीच्या स्नायूच्या दुखापतीमुळे तो उपचार घेत माघारी परतेल. त्यामुळे तो आयपीएलचे पहिले दोन आठवडे खेळू शकणार नाही. लवकर बरा हो थाला, असं सीएसकेने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. आपल्या सोशल मीडियावर दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. ४४ वर्षीय धोनी अजुनही सीएसकेसाठी खेळत असून चाहते त्याला पाहण्यासाठी प्रत्येकवेळी मैदानावर मोठ्या संख्येने गर्दी करतात. धोनीची मैदानात एन्ट्री झाल्यावर सगळे चाहते स्टेडियम दणाणून सोडतात. मात्र यंदा सर्व चाहत्यांन काहीशी वाट पाहावी लागणार आहेसीएसके संघाचा पहिला सामना ३० मार्च राजस्थान रॉयल्स, ३ एप्रिल पंजाब किंग्स आणि ६ एप्रिलला आरसीबीसोबत असणार आहे. त्यामुळे धोनी दुखापतीमुळे या सामन्यांना मुकणार असं दिसत आहे. यामधील आरसीबीविरूद्धचा सामना महत्त्वाचा आहे. कारण विराट कोहली आणि धोनीला पाहण्याची चाहत्यांची इच्छा असते. मात्र आता धोनीची दुखापत कधी बरी होते आणि तो पुनरागमन करतो याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असणार आहे.दरम्यान, धोनी याने ऑगस्ट २०२०मध्ये मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. धोनी आता फक्त आयपीएलमध्येच खेळतो त्यामुळे त्याची एक झलक पाहण्यासाठी मोठी गर्दी करतात. मागील वर्षी धोनीने १४ सामन्यांमध्ये २४.५० सरासरीने १९६ धावा केल्या होत्या. मागील वर्षी ऋतुराजच्या हाताला दुखापत झाल्यावर कर्णधारपदाची सूत्रे आपल्या हातात घेतली होतीत. आता धोनीच्या अनुपस्थितीत ऋतुराजला मैदानात उतरावं लागणार आहे.

## ईशान किशनने विराटचं नाव घेत सांगितलं नेमका सामना कसा गमावला

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ च्या थराराला सुरूवात झाली आहे. पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात पार पडला. या सामन्यामध्ये हैदराबाद संघाने प्रथम फलंदाजी २० ओव्हरमध्ये २०१-९ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना आरसीबीने १६ ओव्हरच्या आतमध्ये हे लक्ष्य पूर्ण करत सामना ६ विकेटने खिशात घातला. या सामन्यात आरसीबीकडून विराट कोहली याने नाबाद ६९ धावांची खेळी केली, तर त्याला देवदत्त पड्डीकल याने २६ चेंडूत ६१ धावा करत दमदार आणि आक्रमक सुरूवात करून दिली. या सामन्यानंतर बोलताना सनरायजर्स हैदराबाद संघाचा कर्णधार ईशान किशन याने आपली प्रतिक्रिया देतान सामना कुठे गमावला हे सांगितलं आहे.मला वाटतं की पहिल्या तीन ते चार ओव्हरमध्ये पिच फलंदाजीसाठी एकदम चांगले होते. पण आम्ही डावाच्या सुरूवातीलाच विकेट गमावल्या. याची आम्हाला पुढे काळजी घ्यावी लागणार आहे. दुसऱ्या डावात विरोधी संघासाठी पिच एकदम सोपी झाल होती कारण चेंडू बॅटवर एकदम न्यवस्थित येत होता. त्यामुळे आता पुढील सामन्यात कोणताही शॉट खेळताना त्याची निवड करताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. विराट भाईने केलेली फलंदाजी खरंच वाखाणण्याजोगी होती. जर त्यांची विकेट लवकर नाही मिळाली तर तो संपूर्ण सामन्यात त्याला रोखणं कठीण होतं. पहिलाच सामना असल्यामुळे आजच्या चुका मान्य आहेत. पण नक्कीच या सामन्यातून आम्ही धडा घेत पुढे दमदार कामगिरी करू. कर्णधारपदाबाबत बोलायचं झालं तर आम्ही स्पर्धेतील पुढील सामने जिंकले तर सर्व काही सोपे होईल, असं ईशान किशन म्हणाला.सनरायजर्स हैदराबाद संघाने प्रथम फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २०१-९ धावा केल्या होत्या. कर्णधार ईशान किशन याने सर्वाधिक ८० धावा केलेल्य. तर अनिकेत वर्मा याने १८ चेंडूत ४३ धावांची आक्रम खेळी करत संघाला २०० चा टप्पा पार करून दिला. आरसीबीकडून जॅकब डफी आणि शेफर्ड यांनी सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. या धावांचा आरसीबी संघाने १५.४ ओव्हरमध्ये यशस्वीपणे पाठलाग पूर्ण केला. या विजयासह आरसीबीने आपला पहिला सामना जिंकला आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दीड वर्षाच्या लेकीला चालताना त्रास, दोन पायांमध्ये फरक; वरुणच्या लेकीला DDH आजाराचं निदान

बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता वरुण धवन याचा बॉर्डर २ जानेवारी महिन्यात प्रदर्शित झाला. सध्या तो सिनेमांमध्ये फार दिसत नाहीए. आता तो त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील एका कठीण प्रसंगामुळं चर्चेत आहे. वरुण आणि त्याची पत्नी नताशा दलाल यांची मुलगी लारा हिला ' डेव्हलपमेंटल डिस्प्लेजिया ऑफ द हिप ' (DDH) या हाडांशी संबंधित गंभीर आजाराचं निदान झालं आहे. नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये वरुणनं याबद्दल खुलासा करत पालकांना जागरूक राहण्याचं आवाहन केलंय.वरुणनं सांगितलं की, लारा दीड वर्षांची असताना तिला चालताना आणि धावताना त्रास होत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तपासणीअंती डॉक्टरांनी तिला 'DDH' असल्याचं सांगितलं. या आजारात कंबरेचा सांधा (Hip Joint) सॉकेटमधून बाहेर सरकतो, ज्यामुळं मुलांचा एक पाय दुसऱ्यापेक्षा लहान वाटू लागतो आणि त्यांची चाल वाकडी होत असते. दीड वर्षांची लेक अडीच महिने प्लास्टरमध्ये होती . लाराच्या या कठीण काळाबद्दल बोलताना वरुण भावूक झाला.तो पुढं म्हणाला की, "लाराला शस्त्रक्रियेची गरज भासली नाही, पण तिचा सांधा पुन्हा



जागेवर बसवण्यासाठी एक विशेष वैद्यकीय प्रक्रिया करावी लागली. त्यानंतर तिला तब्बल अडीच महिने 'स्पायका कास्ट' (Spica Cast) म्हणजेच कंबरेपासून पायापर्यंतच्या कडक प्लास्टरमध्ये ठेवण्यात आलं होतं. तिला भूल दिल्यानंतर जेव्हा ती शुद्धीवर आली आणि स्वतःला प्लास्टरमध्ये पाहिले, तेव्हा तो क्षण आमच्यासाठी अत्यंत वेदनादायक होता.हा आजार प्रामुख्यानं लहान मुलांमध्ये आढळतो. यात कंबरेचं हाड आणि मांडीचं हाड जोडणारा सांधा योग्यरित्या विकसित झालेला नसतो. चालताना त्रास होणं, दोन्ही पायांच्या लांबीत फरक असणे, किंवा पाय पसरताना त्रास अशी काही या आजाराची लक्षणं असतात. या आजारात वेळेवर उपचार झाले नाहीत, तर भविष्यात लवकर आर्थरायटिस (संधिवात) किंवा स्लिप डिस्कचा धोका वाढतो.वरुणनं स्पष्ट केलं की, त्याला कोणाचीही सहानुभूती नको आहे, तर त्याला फक्त जनजागृती करायची आहे. पाश्चात्य देशांमध्ये जन्मानंतर लगेचच याची तपासणी होते, पण भारतात अजूनही याबद्दल फारशी माहिती नाहीए. पालकांनी आपल्या मुलांच्या हालचालींकडं बारकाईनं लक्ष द्यावे आणि काहीही वेगळे वाटल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तसंच लारा आता त्या प्लास्टरमधून बाहेर आली असून तिची प्रकृती वेगानं सुधारत आहे, असंही त्यानं सांगितलं.


## दोघेही कळते आहेत', सोनाक्षी-झहीरच्या लग्नाबद्दल स्पष्टच बोलले शत्रुघ्न सिन्हा

बॉलिवूडची 'दबंग गर्ल' सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांच्या लग्नाला दीड वर्षाहून काही काळ उलटला असला, तरी या आंतरधर्मीय विवाहाची चर्चा अद्याप थांबलेली दिसत नाहीये. दोघांनी अनेकदा अनेक मुलाखतींमध्ये टीका करणाऱ्यांना सडेतोड उत्तरंही दिली होतं. आता सोनाक्षीचे वडील शत्रुघ्न सिन्हा यांनाही या दोघांच्या लग्नाबद्दल विचारण्यात आलं तेव्हा, ते चिडलेले पाहायला मिळालं.नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत शत्रुघ्न सिन्हा यांनी सोनाक्षी आणि झहीर यांच्या लग्नाबद्दल बोलताना स्पष्ट केलं की, सोनाक्षी आणि झहीरच्या लग्नामुळं त्यांचं कुटुंब अत्यंत आनंदी आहे. ते म्हणाले की,सगळं काही अगदी व्यवस्थित आहे. आम्ही खूप खुश आहोत. सोनाक्षी आणि झहीर हे एकमेकांसाठीच बनले आहेत असं वाटतं.जेव्हा त्यांना विचारण्यात आलं की, मुलीनं दुसऱ्या धर्मात लग्न केल्याबद्दल त्यांना काय वाटतं, तेव्हा त्यांनी उत्तर दिलं, ज्याची चर्चा सुरू आहे. ते म्हणाले की, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आम्ही जे काही केलं आहे, ते बेकायदेशीर नाहीए. आम्ही संविधानाच्या विरोधात जाऊन काहीही केलेलं नाही. मुले आता मोठी झाली आहेत, ती 'प्रौढ' म्हणजेच अडल्ट आहेत. जर ती दोघे खुश असतील, तर 'मियां बीवी राजी तो क्या करेगा काजी'. आपण त्यांना पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे आणि मी त्यांच्या पाठीशी उभा आहे.लग्नानंतर सोशल मीडियावर झालेल्या ट्रोलिंगवरही सिन्हा यांनी भाष्य केलं. काही लोकांना काहीही काम नसतं, त्यामुळं दुसऱ्यांच्या आयुष्यावर भाष्य करणं हेच त्यांचं काम असतं.

लग्नाचा निर्णय हा दोन व्यक्तींचा वैयक्तिक निर्णय असतो आणि त्यात कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही," अशा शब्दांत त्यांनी टीकाकारांना गप्प उत्तर दिलंयसोनाक्षी आणि झहीरच्या लग्नाबद्दल बोलायचं झालं तर त्यांनी २३ जून २०२४ रोजी अत्यंत साध्या पद्धतीनं झहीरच्या घरी नोंदणीकृत विवाह केला होता. सुरुवातीला या लग्नाला कुटुंबाचा विरोध असल्याच्या अफवा होत्या, मात्र शत्रुघ्न सिन्हा यांनी स्वतः लग्नात उपस्थित राहून या चर्चांना पूर्णविराम दिला होता.

## इतकी क्रेझ की 3 मिनिटांच्या या गाण्याने उडवला धुरळा; 1.5 मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार

भोजपुरी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय गायक-अभिनेता अरविंद अकेला कल्लू आणि अभिनेत्री आकांक्षा पुरी यांचे नवे तडक-भडक गाणे 'कमर पे तोरा हाथ बा' नुकतेच प्रदर्शित झाले असून प्रेक्षकांकडून त्याला जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. रिलीज होताच या गाण्याने यूट्यूबवर सुमारे 1.5 मिलियनपेक्षा अधिक व्ह्यूज मिळवले आहेत आणि सोशल मीडियावरही याची मोठी चर्चा सुरू आहे.या गाण्याचा टीझर 26 मार्च रोजी दोन्ही कलाकारांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केला होता. टीझर पाहिल्यानंतर चाहत्यांमध्ये या गाण्याबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. गाणे रिलीज होताच प्रेक्षकांनी त्यावर अक्षरशः तुटून पडत ते वारंवार पाहणे आणि ऐकणे सुरू केले आहे.या गाण्यात अरविंद अकेला कल्लू आणि आकांक्षा पुरी यांची जोडी विशेष लक्ष वेधून घेत आहे. गाण्याला आवाज स्वतः अरविंदने दिला असून, अभिनेत्री आकांक्षासाठी गायिका शिवानी सिंहने आपला आवाज दिला आहे. गाण्याचे बोल प्रेक्षकांच्या ओठावर चढले असून त्यातील तडका-भडका आणि ठेका लोकांना भुरळ घालत आहे.व्हिडिओमध्ये आकांक्षा पुरीचा ग्लॅमरस आणि किलर लूक प्रेक्षकांना खूपच आवडत आहे. तिची आणि अरविंदची केमिस्ट्रीही जबरदस्त दिसून येते. गाण्यामध्ये आकांक्षा डान्स करताना घाबरत असल्याचे सांगते, कारण तिच्या फिगरकडे पाहून लोक वेडे होत असल्याची तिला भीती वाटते. त्यावर अरविंद तिला धीर देताना म्हणतो की घाबरण्याचे काही कारण नाही, कारण तिच्या कंबरेवर त्याचा हात आहे.



या संवादांमुळे आणि एक्सप्रेशन्समुळे गाण्याची मजा अधिक वाढली आहे.

या गाण्याचे बोल अवधेश प्रेम यादव यांनी लिहिले असून संगीत प्रियांशु सिंह यांनी दिले आहे. प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून सोनू श्रीवास्तव यांनी काम पाहिले आहे, तर व्हिडिओचे दिग्दर्शन बिभांशु तिवारी यांनी केले आहे. हे गाणे T-Series वर रिलीज करण्यात आले आहे.प्रेक्षकांकडून या गाण्यावर मिश्र प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांना अरविंद आणि आकांक्षा यांची जोडी खूपच आवडली असून त्यांनी त्यांच्या केमिस्ट्रीचे कौतुक केले आहे.

## मुंबईच्या या भागात माधुरी दीक्षित हिचे ऑफिस, तब्बल इतके लाख भाडे आणि...

बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित कायमच चर्चेत असलेले नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून माधुरी सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय आहे. यासोबतच अनेक रिॲलिटी शोमध्येही माधुरी दीक्षित हजेरी लावत आहे. माधुरीला धडकन गर्ल म्हणूनही ओळखले जाते. माधुरी दीक्षितच्या सौदर्यावर अनेकजण घायाळ आहेत. माधुरीने एक मोठा काळ बॉलिवूडमध्ये गाजवला आहे. विशेष म्हणजे आताही तिची एक क्रेझ लोकांमध्ये बघायला मिळते. माधुरीचा चाहतावर्ग अत्यंत मोठा आहे. माधुरी दीक्षित सध्या तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळे चांगलीच चर्चेत आहे. यादरम्यानच आता माधुरीने मोठी खरेदी केली. मुंबईच्या लोअर परेल भागात तिने एक आलिशान ऑफिस भाड्याने घेतले. विशेष म्हणजे या ऑफिसला किराया असा तसा नसून खूप जास्त आहे. लोअर परेलच्या अत्यंत महत्वाच्या भागात माधुरीने हे ऑफिस पाच वर्षांकरिता किरायाने घेतले.मोठे डिपॉझिटही माधुरी दीक्षितने या ऑफिसकरिता मोजले आहे. माधुरी दीक्षित हिने लोअर परेलच्या वन लोढा प्लेस या इमारतीमध्ये आपले नवीन ऑफिस खरेदी केले. माधुरीने 5 वर्षांच्या कराराकरिता 2. 81 कोटी रूपडे भाडे दिले. यासोबतच 17 लाख रूपये सिक्युरिटी डिपॉझिट तिने भरला आहे. 72,600 रूपये स्टॅम्प ड्युटी देखील माधुरी दीक्षितकडून भरण्यात आली.फक्त ऑफिसच नाही तर एक कार पार्किंगही मिळाली आहे. या करारानुसार, भाड्यात दरवर्षी 5 टक्क्यांनी वाढ होणार आहे. या पाच वर्षात भाडे 5 लाखाच्या पुढे जाणार आहे. वरळी येथे माधुरी दीक्षितने सी व्ह्यू अपार्टमेंट खरेदी केली होती. त्यानंतर जवळपास त्याच परिसरात माधुरी दीक्षितकडून ही मोठी खरेदी करण्यात आली. अनेक वर्ष विदेशात राहिल्यानंतर आता कुठे पुन्हा माधुरी दीक्षित भारतात व्यावसायात सक्रिय होताना दिसत आहे.लग्न झाल्यानंतर माधुरी दीक्षित अनेक वर्ष विदेशात राहिली. आता पुन्हा ती पतीसोबत भारतात आलीये. माधुरी दीक्षितच्या पतीचे एक युट्यूब चॅनलही आहे, या युट्यूब



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व आमदार सिद्धार्थ खरात यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विरोधात कारवाई करा

**जनसंचलन/ मेहकर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे व मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या बद्दल आक्षेपार्ह वक्तव्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित करून सामाजिक व राजकीय तेढ निर्माण केल्याप्रकरणी संदीप तट्टे व इतर दोषीवर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन आज दिनांक २८ मार्च रोजी शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने उपविभागीय पोलीस अधिकारी,मेहकर व ठाणेदार,मेहकर यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २२ मार्च २०२६ रोजी दुपारनंतर प्रसार माध्यमावर माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख यांच्या विषयी निंदाजनक वक्तव्य करून आमदार सिद्धार्थ खरात यांना मारण्याची धमकी दिली. तसेच हा व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे (फेसबुक, व्हाट्सॲप, इंस्टाग्राम) प्रसारित करून धमकी देऊन दादागिरीची भाषा वापरून आमदार सिद्धार्थ खरात यांना घरातून



ओढून मारू, आमच्यावर असे वीस- पंचवीस गुन्हे आहेत आम्ही पुण्याला घाबरत नाही,अशी आक्षेपार्ह भाषा संदीप तट्टे याने केली आहे. यामुळे दहशत निर्माण होऊन सामाजिक व राजकीय तेढ निर्माण करण्यात आली आहे. यप्रकरणी संबंधित आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जीविताला काही धोका निर्माण झाल्यास होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही दिला आहे. निवेदन देताना उपजिल्हाप्रमुख आशिष भाऊ रहाटे, तालुकाप्रमुख निंबाभाऊ पांडव, शहर प्रमुख तथा नगराध्यक्ष किशोरभाऊ गारोळे, युवा शहर प्रमुख आकाशभाऊ घोडे, तालुका समन्वयक संजय वडकर, नगरसेवक महेश रिंढे, नितीन तुपे, निसार अन्सारी, एडवोकेट संदीप गवई, डॉ. शेषराव बदर, साहेबराव हिवाळे, दत्तात्रय घनवट, परमेश्वर दहातोंडे, पंडित बापू देशमुख, अमोल बोरे, राजेक अली, सनी सांगळे,गोपाल गायकवाड, अमोल मोरे, विकास शिंदे,शुभम पानखेडे,विलास शिंदे, गणेश गावंडे, संतोष लाड, पवन टाले, गबाजी गवई, छट्टू गवळी, गजानन जाधव, राजू दांदडे, छगन सांगोळे, समाधान सरदार आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# गो. से. महाविद्यालयात जागतिक चिमणी दिवस उत्साहात साजरा

**जनसंचलन/ खामगाव**

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचालित गो.से. महाविद्यालय,खामगांव येथील प्राणीशास्त्र विभागाद्वारे दिनांक २० मार्च २०२६ रोजी जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून एक मूठ धान्य पक्ष्यांसाठी या संकल्पनेवर आधारित उपक्रमाचा पुढील टप्पा साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस. तळवणकर अध्यक्षस्थानी होते , प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. ए. व्ही. पडघन, प्रमुख मार्गदर्शक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मनोज बाभळे, प्रा अनिकेत वानखडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे यांनी सांगितले की, जागतिक चिमणी दिनाचा उद्देश, चिमण्यांच्या घटत्या लोकसंख्येबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या संवर्धनाला प्रोत्साहन देणे हा आहे. या पक्ष्याच्या संरक्षणासाठी संवर्धनाचे प्रयत्न अधिक बळकट आणि व्यापक करणे, तसेच आपल्या परिसंस्थेसाठी चिमण्यांचे असलेले महत्व लोकांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे, हे आहे.आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून जागतिक चिमणी दिवस, वसुंधरा दिवस,जागतिक पाणथळ दिवस,व्याघ्र दिवस,वन्यजीव सप्ताह इत्यादी नानाविध प्रकारचे दिवस साजरे करीत असतो.पर्यावरण संवर्धन हा मुख्य हेतू हे दिवस साजरे करण्यामागचा आहे. गेल्या काही वर्षात शहरांमध्ये चिमण्यांच्या घटत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आधुनिक वास्तुकलेच्या बहुमजली इमारतींमध्ये चिमण्यांना जुन्या शैलीतील घरांप्रमाणे राहायला जागा मिळत नाही. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए.व्हि.पडघन यांनी सांगितले कि ,आधीच्या काळात कौलारू घरं व त्यासमोर असणाऱ्या विहीर यामुळे चिमण्यांना आपले घर बनविणे अतिशय सोपे होते. बदलत्या बांधकामाच्या पद्धतीमूळे पक्षांच्या निवासावर देखील परिणाम होत आहे तसेच कमी होत चाललेली जंगले आणि शहरात निर्माण झालेली मोबाईल टॉवर्स व तारांची जंगले,शेतात होणाऱ्या हानीकारक रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वारेमाप वापर, असे विषारी धान्य खाऊन चिमण्या मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. सकाळी आपले दार उघडल्यावर चिवचिव करणारी चिऊताई शहरी व आता ग्रामीण भागातून सुद्धा हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे चिमणी संवर्धनाची जबाबदारी आपन घेऊया, त्यांची संख्या पुन्हा वाढण्यासाठी आवश्यक प्रयत्न करू या.

# तहसीलदार भूषण पाटील यांची अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर धडाकेबाज कारवाई

## अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर चार लाख दहा हजार रुपये ठोठावला दंड




**जनसंचलन/ लोणार**

मराठवाड्यातून अवैध रेती वाहतूक करणारे दोन वाहनावर लोणार तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार भुषण पाटील यांनी धडाकेबाज कारवाई करत दोन वाहनांना चार लाख दहा हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की दिनांक २१ मार्च २०२६ रोजी मराठवाड्यातल्या रेती घाटावरून अवैद्य रेती वाहतूक होण्याची गोपनीय माहिती तहसीलदार भूषण पाटील यांना मिळाली त्यांनी तात्काळ आपले सहकारी निवासी नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे महसूल अधिकारी मंदार तनपुरे सचिन शेवाळे यांना सोबत घेत लोणार मंठा रोडवरील देऊळगाव कुंडपाळ फाट्याजवळ गाडी क्रमांक एम एच २१ बीएच ९४ २२ हे वाहन तपासणी करत असताना अवैध रेती वाहतूक करताना आढळून आल्याने त्या वाहनाला तात्काळ लोणार पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले असून शरद सुरेश खंदारे रा.कानडी तालुका मंठा जिल्हा जालना यांच्या मालकीचे हे वाहन होते तर दुसरे वाहन गजानन आसाराम घुगे रा. बोराखेडी यांच्या मालकीचे वाहन क्रमांक एम एस ३७ ११ ८७ तीन ब्रास अवैध रेती वाहतूक करताना रायगाव येथील रस्त्यावर आढळले असून त्या वाहनाला सुद्धा लोणार पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले आहे त्यापैकी दोन ब्रास वाहना करता एक लाख ४४ हजार रुपये दंड ठोठावला असून तीन ब्रास वाहनाला दोन लाख ६६ हजार असा दंड ठोठावला आहे या कारवाईमुळे अवैद्य रेती वाहतूक करण्याचे धाबे दणाणले आहे यापुढे अवैध रेती वाहतूक करताना कुठलेही वाहन आढळले तर त्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा लोणार तहसीलदार भूषण पाटील यांनी दिला आहे

# एल.टी.टी. बल्लारशहा रेल्वेला शेगांव येथे थांबा मंजुर

## खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली भेट

जनसंचलन/बुलढाणा

संतनगरी शेगांव रेल्वे मार्गाने नियमीत धावणाऱ्या परंतु थांबा नसणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मंजुरी केल्याप्रकरणी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची आज केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आभार व्यक्त केले. तर खामगांव-जालना रेल्वे मार्गा संदर्भात गोड बातमी लवकरच देऊ असे सुचक वक्तव्य केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी चर्चेदरम्यान केले. त्यामुळे खामगांव-जालना रेल्वे मार्गाबद्दल केंद्र सरकारची सकारात्मकता दिसुन आली. या रेल्वे मार्गासंदर्भात अंतिम मंजुरातीची घोषणा होण्याची शक्यता आहे.

विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या बुलढाणा जिल्हयातील संत नगरी शेगांव येथे दररोज देशभरातुन लाखो भाविक येत असतात. शेगांव रेल्वे मार्गावरील नियमीत धावणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेस सह इतर ३ सुपर फास्ट एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा, अशी मागणी केंद्रिय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गेल्या महिन्यामध्ये केंद्रिय रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन केली होती. त्यातील एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला रेल्वे मंत्रालयाच्या वतीने थांबा मंजुर करण्यात आला आहे. आज २७ मार्च ला केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची दिल्ली येथे भेट घेऊन बल्लारशहा एक्स्प्रेसला थांबा दिल्याबद्दल केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार व्यक्त केले. याचवेळी खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चा करत असतांनाच त्यांनी रेल्वे मंत्रालय या रेल्वे मार्गासंदर्भात वेगाने काम करत असुन लवकरच तुम्हाला आनंदाची बातमी देऊ असे सुचक विधान त्यांनी केले. खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भुमिका दर्शविल्याने खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात केंद्र सरकारच्या वतीने लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी खामगांव-जालना रेल्वे



मार्गाबद्दल विस्तृत चर्चाही यावेळी मंत्री महोदयांसोबत केली. इंग्रज काळापासुन हा रेल्वे महामार्ग प्रलंबित असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खामगांव येथे झालेल्या जाहिर सभेत हा रेल्वे मार्ग करण्याचे आश्वासन बुलढाणा जिल्हयातील जनतेला दिले असल्याचे सांगुन या रेल्वे मार्गामुळे मध्य रेल्वे व दक्षिण रेल्वे जोडल्या जाणार आहे. हा रेल्वे मार्ग व्हावा हि जिल्हयातील नागरीकांची जनभावना आहे. असेही त्यांनी रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चेत सांगीतले. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी दर्शविलेल्या सकारात्मक भुमिकेमुळे या रेल्वे मार्गाला अंतिम मंजुरात मिळण्याची शक्यता आहे.

# चिखलीत इंधन साठेबाजीप्रकरणी रेणुका पेट्रोल पंपचालकावर गुन्हा

जनसंचलन/ चिखली

शहरात इंधन तुटवड्याच्या अफवेच्या पार्श्वभूमीवर साठेबाजीसाठी सरसावलेल्या ग्राहकांना बॅरल, कॅन आदींमध्ये मनमानी प्रमाणात पेट्रोल डिझेल भरून देणे येथील जालना रोडवरील रेणुका पेट्रोल पंप चालकास चांगलेच भोवले आहे. या पंपावरील गैरप्रकारासंदर्भातील लोकमतने प्रकाशित केलेले वृत्त आणि समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या व्हिडिओची दखल घेत पुरवठा विभागाने चिखली पोलिसांत संबंधित पंप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. इंधन टंचाईच्या अफवांच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी शहरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी नागरिकांनी पंपांवर मोठी गर्दी केली होती. या दरम्यान रेणुका पेट्रोल पंपावर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करून संबंधित चालकाने ग्राहकांना मोठ्या प्रमाणात कॅन, बॅरल व प्लास्टिक कंटेनरमध्ये इंधन विक्री केल्याचे समोर आले. तहसील कार्यालयातील पुरवठा पेट्रोल पंप चालकावर गुन्हा दाखल झाल्याने अन्य पेट्रोलपंप चालकातही निर्माण झाली धास्ती निरीक्षक रवींद्र संजय वाघ यांनी याबाबत चिखली पोलिसांत तक्रार दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी २६ मार्च २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, पेट्रोल पंपावरून इंधन केवळ वाहनांच्या टाकीतच देण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. कॅन, बाटली किंवा इतर कोणत्याही अनधिकृत कंटेनरमध्ये इंधन विक्री करणे नियमबाह्य व बेकायदेशीर असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. तथापि, संबंधित पंपावर उघड्या टाक्या व प्लास्टिक बाटल्यांमध्ये पेट्रोल-डिझेल भरून दिले जात असल्याचे व्हिडिओद्वारे उघड झाल्याने प्रशासनाने कारवाई केली. या प्रकारामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित पंप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# अकोला (खु.) येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला अक्षय पाटील यांच्या प्रयत्नामुळे १ लाख रुपयांची मीळाली आर्थिक मदत....!

जनसंचलन/ जळगाव जा

तालुक्यातील मौजे आकोला (खु.) येथील महिला शेतकरी रत्नकलाबाई सुरेश अंबर्ते यांनी सततची नापीक व कर्जबाजारीपणाला कंटाळून त्यांच्या राहत्या घरी दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी आत्महत्या केली. रत्नकलाबाई अंबर्ते ह्या अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्यावडे ग्रामीण बँकेचे थकीत पीक कर्ज होते तसेच सतत होत असलेली नापिकी त्यामुळे कर्जाचा भरणा कसा करायचा व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा या कारणामुळे रत्नकलाबाई यांनी आपली जीवन यात्रा संपवली. सदर आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब अतिशय मेहनती असून त्या कुटुंबाला शासनाची आर्थिक मदत मिळावी यासाठी युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी शासन दरबारी वेळोवेळी पाठलाग केला व अखेर त्या शेतकरी कुटुंबाला शासनाच्या वतीने १ लाख रुपयाची आर्थिक मदत मंजूर झाली असून ती मदत मयत रत्नकलाबाई अंबर्ते यांचे पती सुरेश अंबर्ते यांच्या नावे जमा सुद्धा झाली.

# मंदार बाहेकर यांची -१ बुलढाणा विधानसभा प्रमुख म्हणून निवड

जनसंचलन/ बुलढाणा

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणासाठी राबविण्यात येत असलेल्या अभियानांतर्गत महत्त्वपूर्ण संघटनात्मक नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. या अंतर्गत बुलढाणा विधानसभा क्षेत्रासाठी श्री. मंदार भास्करराव बाहेकर यांची -१ विधानसभा प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. मंदार भास्करराव बाहेकर हे पक्षाचे जिद्दी, कर्तव्यनिष्ठ आणि तळागाळातील कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. भाजप शहर अध्यक्ष, भाजप शहर, युवा व किसान मोर्चामध्ये सरचिटणीस पदावर कार्य करत त्यांनी संघटन विस्तारात मोलाची भूमिका बजावली आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या मंदार बाहेकर यांनी गोवा विधानसभा निवडणूक, बूथ बळकटीकरण मोहीम तसेच विविध विस्तार योजनांमध्ये आघाडीवर राहून काम केले आहे.

पक्षाच्या प्रत्येक स्तरावर दिलेल्या जबाबदाऱ्यांना शंभर टक्के न्याय देत, संघर्षातून आणि सातत्यपूर्ण मेहनतीतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या मंदार बाहेकर यांच्या कामाची दखल घेत



पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची विधानसभा पातळीवरील जबाबदारी सोपवली आहे. ही नियुक्ती त्यांच्या कार्याची पावती असून, तळागाळातील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी कोरोना काळात गरजूंना मदत, रक्तदान शिबिरे व विविध जनसेवा उपक्रमांद्वारे समाजाशी घट्ट नाळ जपली आहे. -१ विधानसभा प्रमुख म्हणून मंदार बाहेकर यांच्याकडून मतदार यादी पुनर्निरीक्षण, बूथ स्तरावर भक्कम संघटन उभारणे आणि प्रत्येक मतदारापर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचविण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे बुलढाणा विधानसभा क्षेत्रात भारतीय जनता पार्टी अधिक सक्षम होऊन आगामी निवडणुकांसाठी मजबूत आणि विजयी पायाभरणी होणार, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८